# बृहन्मुंबई महानगरपालिका

जकात/ 190 /व्यय /दि.17. 08. 2022

**सुचना**

विषय- जकात मुख्यकार्यालय कांजुरमार्ग (पूर्व) येथील दैनंदिन स्वच्छता व परिरक्षणासाठी सहा महिन्यांच्या कालावधीकरिता शासन मान्य बेरोजगार स्थानिक स्वंयसेवी संस्थेकडुन कंत्राटी पध्दतीने एकुण 2 (पुरूष/महिला) कामगारांची नेमणूक करण्याबाबत.

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी कांजुरमार्ग (पूर्व) जकात मुख्यकार्यालय, येथील दैनंदिन स्वच्छता व परिरक्षणाकरिता एकुण 2 (पुरूष/महिला) कामगारांची कंत्राटी पध्दतीने सहा महिन्यांच्या कालावधीकरिता नियुक्ती करण्याकरिता शासन मान्य नोंदणीकृत स्वयंसेवी स्थानिक बेरोजगार संस्थेकडुन व कामगार विभागाच्या परिपत्रकानुसार सदर संस्थामधील कंत्राटी कामगारांना प्रती दिन प्रति कामगार वेतन देण्यात येईल. त्यासाठी शासन मान्यताप्राप्त नोंदणीकृत इच्छूक संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

परिपत्रक क्र. सीए/ एफआरजी / 40 दि.13.01.2021 अन्वये रु. 1000/- व परिपत्रक क्र.एफआरटी / 17 दि.23.12.2021 अन्वये 18% ( वस्तू व सेवाकर असे एकुण रु.1180/- इतकी रक्कम अदा केल्यानंतरच शासन मान्य स्थानिक बेरोजगार नोंदनीकृत संस्थांनकडुन अर्ज स्विकारण्यात येतील.

तसेच खालील नमूद पात्रतेच्या कागदपत्रासह दि.24.08.2022 रोजी दुपारी 4.00 वाजेपर्यंत खालील नमूद पत्यावर अर्ज सादर करणे आवश्यक आहे. इच्छुक संस्थेकडुन अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जाची छाननी करून पात्र ठरलेल्या संस्थेच्या अर्जामधून सोडत पध्दतीने संस्थेची निवड 6 महिन्याच्या कालावधी करिता (दि.01.09.2022 पासून किंवा कार्यादेश दिल्याच्या दिनांकापासून 6 महिने ) विहित केलेल्या कर्तव्य सुची आणि अटी व शर्ती सापेक्ष 6 महिन्याच्या कालावधीकरिता करण्यात येईल.

1. स्वंयसेवी संस्था ही शासन मान्यता प्राप्त नोंदणीकृत स्थानिक बेरोजगार स्वयसेवी संस्था असणे आवश्यक आहे. अर्ज सादर करताना संस्थेच्या सर्व नोंदणी प्रमाणपत्रांच्या छायांकित सत्य प्रती अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
2. स्वयंसेवी संस्थेच्या नावाचे Pan card असणे आवश्यक आहे.
3. स्वयंसेवी संस्थेकडे संस्थेच्या नावे नोंदणी केलेला GST नंबर असणे आवश्यक आहे.
4. स्वयंसेवी संस्थेकडे बृहन्मुंबई महापालिकेकडे नोंदणी केलेला वेंडर नंबर असणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबींची पुर्तता करीत असलेल्या शासन मान्यता प्राप्त नोंदणीकृत स्थानिक बेरोजगार स्वंयसेवी संस्थानीच सीलबंद लिफाप्यामध्ये अर्ज सादर करावेत. अन्यथा सदर अर्ज बाद करण्यात येईल. कृपया याची नोंद घ्यावी.

पत्ता खालील प्रमाणे-

उप करनिर्धारक व संकलक यांचे कार्यालय,
व्यय विभाग, दुसरा मजला,
ऍमीनीटी बिल्डिंग, लोढा कॉम्प्लेक्स,गेट नं.03
कांजूरमार्ग (पूर्व) मुंबई-400 042

सही/- दि.17.08.2022

उप **करनिर्धारक व संकलक** (जकात)